| जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी कार्यालय नांदेड | |
|---|---|
| वेब साईट - www.nanded.gov.in | E-mail- nandedrdc@ gmil.com |
| Phone ०२४६२-२३५०७७ | Fax No- ०२४६२-२३८५०० शाखा - महसूल १ |
| क्र.२०२०/आरबी-१/डेस्क-२/टे-४/सिआर- | दिनांक १५.०३.२०२० |

प्रति,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद, नांदेड
२) आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड
३) पोलीस अधीक्षक, नांदेड यांना कार्यवाहीस्तव
४) सर्व उपविभागीय दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
५) सर्व तालूका दंडाधिकारी, नांदेड जिल्हा
६) सर्व मुख्याधिकारी, नगरपरिषद/नगरपंचायत नांदेड जिल्हा

**विषयः-** कोरोना विषाणूंचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेच्या अनुषंगाने खाजगी शिकवणी (Coaching Classes ) व अभ्यासिका केंद्र बंद ठेवणेबाबत.

**संदर्भः-**१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांचे पत्र क्र.कोरोना/२०२०/प्रक्र.५८/आरोग्य-५ दि.१४.०३.२०२०.
२) साथरोग प्रतिबंधक कायदा १८९७ चे खंड २,३ व ४
३) सार्वजनिक आरोग्य विभाग, महाराष्ट्र शासन यांचेकडील अधिसुचना क्र. करोना २०२०/प्रक्र.५८/आरोग्य -५ दि.१४ मार्च,२०२०

उपरोक्त विषयी संदर्भीय पत्र क्र.१ अन्वये मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई यांनी राज्य शासनाने कोरोना विषाणूचा (कोव्हिड १९) प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ दि.१३ मार्च २०२० पासून लागू करुन खंड २,३ व ४ मधील तरतुदीनुसार दिनांक १४ मार्च,२०२० अधिसुचना निर्गमित केली आहे.

त्यामुळे साथरोग प्रतिबंधात्मक कायदा १८९७ मधील तरतुदीनुसार संदर्भात नमुद अधिसुचना दिनांक १४ मार्च, २०२० मध्ये मला उक्त प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपायोजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी संक्षम प्राधिकारी म्हणून घोषित केले आहे, त्या आधारे कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपायोजनेचा एक भाग म्हणून नागरीकांची एका ठिकाणी होणारी गर्दी टाळण्यासाठी नांदेड जिल्हयातील सर्व खाजगी शिकवणी (Coaching Classes ) व अभ्यासिका केंद्र दि.३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्याचे निर्देश देत आहे.

Scanned by CamScanner

त्या अनुषंगाने आपणास सूचित करण्यात येते की, नांदेड जिल्हयातील महानगरपालिका व सर्व नगरपालिका, सर्व नगरपंचायत क्षेत्रातील खाजगी शिकवणी (Coaching Classes ) व सर्व प्रकारचे अभ्यासिका केंद्र, दिनांक ३१.०३.२०२० पर्यंत बंद ठेवण्यात याव्या व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा.

(डॉ. विपीन इटनकर)भा.प्र.से.
**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

**प्रत माहितीस्तव सविनय सादर.**

१) मा.प्रधान सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग, मुंबई.
२) मा.विभागीय आयुक्त, औरंगाबाद

**जिल्हादंडाधिकारी, नांदेड**

Scanned by CamScanner